5662

जा.क्र.जिपऔ/१-प्रशासन/कावि/ /२०१८
कार्यालय जिल्हा परिषद औरंगाबाद
दिनांक:-२८/१२/२०१८

प्रति,

**अनुकंपा प्रतिक्षा सुचीतील**
**सर्व उमेदवार**

विषयः- अनुकंपा प्रतिक्षा सुची दिनांक २१.१२.२०१८ रोजी प्रसिध्द केलेल्या यादीवर आक्षेपाच्या अनुषंगाने सुनावणी बाबत.

संदर्भः- १) या कार्यालयाने अनुकंपा प्रतिक्षा सुची अंतरिम दिनांक आपल्या कार्यालयाचे पत्र क्र.जिपऔ/१-प्रशासन/कावि/५६०१/२०१८/दिनांक २१.१२.२०१८
२) आपले आक्षेप

उपरोक्त विषयी संदर्भ क्र. १ नुसार जिल्हा परिषद,औरंगाबाद अंतर्गत अनुकंपा प्रतिक्षा सुची जिल्हा परिषदेच्या संकेतस्थळावर व नोटीस बोर्डवर डकविण्यात आलेली होती. सदर प्रतिक्षा सुची मध्ये काही आक्षेप असल्यास ३ दिवसाच्या आत सामान्य प्रशासन विभागास आवश्यक त्या पुराव्यासह सादर करणे बाबत कळविण्यात आलेले होते. त्यानुसार सदरील यादीवर एकुण (७) आक्षेप प्राप्त झालेले आहेत. प्राप्त झालेल्या आक्षेपावर सुनावणी घेवून त्यानुसार अनुकंपा सेवाजेष्ठता यादी अंतिम करण्यात येणार आहे.

प्राप्त आक्षेपाची सुनावणी निम्नस्वाक्षरी धारकाचे दालनात दिनांक २९.१२.२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता आयोजीत करण्यात आलेली असुन उक्त आक्षेपा व्यतीरीक्त इतर उमेदवारांचे आक्षेप असल्यास आक्षेप व आक्षेपाचे पृष्ठयर्थ पुराव्यासह सुनावणीस उपस्थित राहण्याची संधी देण्यात येत आहे. नियोजीत सुनावणीस कोणताही उमेदवार अनुपस्थित राहिल्यास त्या बाबत कोणाचेही काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन सेवाजेष्ठता यादी अंतिम करण्यात येईल. तसेच यानंतर प्राप्त आक्षेपाचा विचार केला जाणार नाही. याची नोंद घ्यावी.

(शिरीष बनसोडे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद औरंगाबाद.

प्रतिलिपीः-
मा.मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद,औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर

स्वाक्षरीत/-
(शिरीष बनसोडे)
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद औरंगाबाद.